# अज्ञात आरोपीचा शोध घेवुन खुनाचा गुन्हा उघड

दिनांक 30/1/19 रोजी सायंकाळी 08.30 चे सुमारास यातील फिर्यादी मंगेश सुरेश भानखेडे, वय 32 वर्ष, रा ईंझाळा पुलगाव याचे शेतात काम करनारे श्री श्रावण पंधराम यांना कोणीतरी 2 ते 3 अज्ञात ईसमांनी बक-या चोरण्याच्या उददेशाने येवुन संगतमताने डोक्यात लोखंडी पावडयाने डोक्यावर मारून जिवाने ठार केले अशा फिर्यादीच्या तोंडी रिपोर्ट व वैद्यकीय अहवालावरून पोलीस स्टेशन पुलगांव अप क्र 0082/2019 कलम , 302, 307,34 भादवी चा गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

सदर गुन्हयाचा समांतर तपास स्था.गु.शा वर्धा येथील पथकाने केला असता दि.06.02.2019 रोजी मुखबिरकडुन मिळालेल्या विश्वसनीय गुप्त माहितीवरून 1) रमेश शंकरराव पाखरे, वय 40 वर्ष, रा. इंझाळा, ता.देवळी, जि.वर्धा, 2) ईश्वर अशोकराव पिंजरकर, वय 36 वर्ष, 3) अंकुश उर्फ मोन्या विलासराव शेंडे, वय 24 वर्ष दोन्ही रा. इंदिरानगर, नाचणगांव यांचा शोध घेउन त्यांना मौजा इंझाळा व नाचणगांव येथुन तपासकामी ताब्यात घेण्यात आले आहे. गुन्हयाबाबत सखोल विचारपुस केली असता, यातील आरोपी रमेश पाखरे याचा मुलगा अनिकेत पाखरे, वय 18 वर्ष याला यातील मृतक श्रावण दमडु पंधराम, रा. इंझाळा याने जादुटोना केल्यामुळे तो माहे मार्च/2018 मध्ये मरण पावला. त्याचा वेगवेगळया ठिकाणी इलाज करूनही तो दुरूस्त झाला नाही म्हणुन त्याचे मृत्युचा बदला घेण्याच्या उद्देशाने यातील आरोपी रमेश शंकरराव पाखरे याने इतर आरोपी यांचेशी संगनमत करून व त्यांना पैशाचे प्रलोभन देवुन यातील मृतक हा गोटफार्मवर रखवालदार म्हणुन एकटा असल्याची संधी साधुन त्याचा खुन करण्याचे उद्देशाने त्याचे डोक्यावर व तोंडावर लाकडी दांडयाने प्रहार करून त्याला गंभीर जखमी मरणासन्न अवस्थेत तेथेच सोडुन पळुन गेले. या दरम्यान यातील फिर्यादी हा अचानक मोक्यावर पोहचल्याने आरोपीतांनी तेथुन पळ काढला तेव्हा यातील विधीसंघर्शित बालक हा त्याच शेतातील विहीरीत जावुन पडला होता. त्याला यातील फिर्यादीने विहीरीबाहेर काढले होते.

गुन्हयाच्या तपासात असे निष्पन्न झाले की, यातील आरोपी ईश्वर पिंजरकर हा आरोपी रमेश पाखरे याचा साळभाऊ असुन त्यांनी यातील मृतकाला मारण्याकरीता नाचणगाव येथील एका हार्डवेअरचे दुकानातुन टिकासचा लाकडी दांडा खरेदी केला. व सदरचा गुन्हा केल्यानंतर यातील आरोपी रमेश पाखरे याने आरोपी अंकुष शेंडे याला ठरल्याप्रमाणे नगदी 5000/-रु. दिले. तसेच विधीसंघर्शित बालकास आरोपी रमेश पाखरे याने त्याचे राहते घरी आश्रय दिला.

सदर कारवाई मा. पोलीस अधीक्षक डॉ. बसवराज तेली, अपर पोलीस अधीक्षक श्री. निखील पिंगळे, यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री. निलेश ब्राम्हणे यांचे निर्देशाप्रमाणे पो.उप.नि. महेंद्र इंगळे, पंकज पवार, आशिष मोरखडे व गुन्हे अन्वेषण पथकातील कर्मचारी पो.हवा. निरंजन वरभे, नापोशी, यशवंत गोल्हर, रितेश शर्मा दिनेश बोथकर, पोशी संघसेन कांबळे, विकास अवचट, राकेश आष्टनकर सर्व नेमणूक स्था.गु.शा. वर्धा यांनी केली.